PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Zapatlela
Year: 1993

Song: Dhak Dhak manaat zaal suru
Lyricist: Pravin Davane

धक धक मनात झालंय सुरू
सांग सांग तुझ्यासाठी किती झुरू
हे धक धक मनात झालंय सुरू
सांग सांग तुझ्यासाठी किती झुरू
माझ्या मनातलं तुझ्या कानात गं
माझा बाहुला हा तुला सांगतोय गं
अगं होशील का गं माझी राणी
अरं जा जा
चल उडवून देऊ बार
लगीन सराईला
हे चल उडवून देऊ बार
लगीन सराईला

अरे टकमक डोळयात नको बघू
गावात चर्चा होईल सुरू
टकमक डोळयात नको बघू
गावात चर्चा होईल सुरू
अरे बाहूल्याच्या रूपात
नको येऊ लाडात
मनातला बेत तुझ्या कळतोय रं
हा हा होशील का गं
माझी कारभारीण
अरं जा जा
चल उडवून देऊ बार
लगीन सराईला
हे चल उडवून देऊ बार
लगीन सराईला

हा झपाटलेल्या वयात गं
दोघंच भेटलो रानात गं
इपरीत आणू नको मनात रं
बांधीन घर तुजं उन्हात रं

लखलख रूपानं केली जादू
रोज रोज स्वप्नात किती बघू
हे लखलख रूपानं केली जादू
रोज रोज स्वप्नात किती बघू
माझ्या मनातलं तुझ्या कानात गं
माझा बाहुला हा तुला सांगतोय गं
काय गं होशील का गं
माझी बायको
जा जा
चल उडवून देऊ बार
लगीन सराईला
हे चल उडवून देऊ बार
लगीन सराईला

हे बाशींग बांधून येईन गं
मिरवीत मिरवीत नेईन गं
सजून नवरी होईन रं
हळूच लाजून पाहीन रं
ढिंगच्यांग ढिंगच्यांग लागे वाजू
संसार पिरतीचा दोघं थाटू
हे ढिंगच्यांग ढिंगच्यांग लागे वाजू
संसार पिरतीचा दोघं थाटू

माझ्या मनातलं तुझ्या कानात गं
माझा बाहुला हा तुला सांगतोय गं

PlanetRead

Literacy for a Billion

अगं ए नवरदेव पसंत आहे का
हो रं माझ्या राजा
चल उडवून देऊ

बार लगीन सराईला
हां चल उडवून देऊ बार
लगीन सराईला

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*